बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४५ | बुधवार, दि.१६ ऑक्टोबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# महाराष्ट्रात २० नोव्हेंरला विधानसभेकरीता मतदान,२३ ला मतमोजणी



## ● जिल्हयात एकुण ११ लक्ष २१ हजार ४६०बदल,
## ● निवडणुक प्रकियासाठी लागणारे बीएलओ-१२८५
## ● जिल्ह्यात १९४७ सैन्यदलातील मतदार
## ● जिल्ह्यात वयोवृध्द ९१४७ व दिव्यांग ८७२७ मतदार

**एकून मतदार केंद्र- १२८२**
**अर्जुनी मोर ३१५ केंद्र**
**तिरोडा २९५ केंद्र**
**गोंदिया ३६१ केंद्र**
**आमगाव ३११ केंद्र**

**गोंदिया :** मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची दिल्लीतील विज्ञान भवनात पत्रकार परिषद घेण्यात आली. यात महाराष्ट्रात एकाच टप्प्यात २० तारखेला मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे पत्रकार परिषद घेवून महाराष्ट्र आणि झारखंड राज्यांच्या विधानसभा निवडणुका तसेच दे-शातील विधानसभा, लोकसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक कार्यक्रमांच्या या घोषणेने राज्यात आजपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.महाराष्ट्रात २८८ पैकी २३४ जागा या सर्वसाधारण उमेदवारांसाठी तर एसटी प्रवर्गासाठी २५ तर २९ जागा या अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत.

निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीची घोषणा केली त्या क्षणापासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीचा उत्सव अस-लेली ही निवडणूक पारदर्शक व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. बळाचा प्रयोग (मसल पावर), पैशांचा वापर (मनी पावर), चुकीची माहिती (मिस इन्फॉ ॉर्मेशन) आणि आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन ही निवडणूक यंत्रणेसमोरील महत्वाची आव्हाने असून यावर मात करण्यासाठी आयोगाच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना करण्यात येतील असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी श्री. नायर बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक किरण अंबेकर, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेवून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची घोषणा केली असून आजपासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. यासंबंधिची अधिसूचना जारी करण्यात आली असून आदर्श आचारसंहितेची माहिती सुध्दा निवडणूक आयोगाने दिली आहे. सदर अधिसूचनेद्वारे २२ ऑक्टोबर रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करणे, २९ ऑक्टोबर- नामनिर्देशन पत्रे सादर करण्याची अंतिम मुदत, ३० ऑक्टोबरला नामनिर्देशन पत्राची छाननी, ४ नोव्हेंबर- उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत, २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

सोशल मिडिया, पेड न्यूज व फेक न्यूजवर आयोगाची व जिल्हा प्रशासनाची करडी नजर असणार असून फेक न्यूज पसरविणाऱ्यावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेल कडक कारवाई करेल. नागरिकांनी सोशल मिडियावर व्यक्त होतांना काळजी घ्यावी तसेच चुकीचे मेसेज पोस्ट करु नये किंवा फॉरवर्ड करु नये असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्ह्यात कुठेही अनुचित घटना घडू नये यासाठी जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य अपेक्षीत आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

गोंदिया जिल्ह्यात ६३-अर्जुनी मोरगाव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया व ६६-आमगाव असे एकूण ४ विधानसभा मतदार संघ आहेत. दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत जिल्ह्यात एकूण ११ लाख २१ हजार ४६० मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५२ हजार १८१ असून स्त्री मतदार ५ लाख ६९ हजार २६९ आहेत व इतर १० मतदार आहेत. जिल्ह्यात उपलब्ध असलेले EVM-VVPAT (FLC OK) मशिन्सची संख्या- CU-१५६७, BU-२८५२, VVPAT-१६९५ आहेत. एकूण मतदान केंद्रांची संख्या १२८४ आहे. या निवडणुकीत जिल्ह्याची मतद-ानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशास-नाद्वारे विविध उपक्रम राबवून मतदान जनजागृतीद्वारे प्रयत्न करण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागरिकांना निवडणूक विषयी माहिती घेण्याकरीता व निवडणूक विषयी तक्रार बाबत गोंदिया जिल्ह्यामार्फत हेल्पलाईन क्रमांक १९५० (टोल फ्री), दू-रध्वनी क्रमांक ०७१८२-२३६१४८, मोबाईल क्रमांक ८०८०४५३१५२ कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या आदर्श आचारसंहिता दरम्यान निवडणुकीशी संबंधीत विविध कामे सुरळीत व विहित कालावधीत पार पाडण्याच्या कामाकरीता भारत निवडणूक आयोगाचे सूचनेप्रमाणे जिल्हास्तरावर १६ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे असे ते म्हणाले.

आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत अवैध रक्कम, दारु, प्रतिबंधीत औषधे, नशिले पदार्थांच्या वाहतुकी संदर्भात होणाऱ्या जप्तीबाबत Election Seisure Management System (ESMS) प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली असून अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडणुक कालावधीत प्रसारमाध्यमांनी फेक न्यूज पोस्ट करुन विनाकारण अफवा पसरवू नये. पेड न्यूज बाबत आयोगाच्याच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे, अन्यथा प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येणार. मतदान हा एक उत्सव आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील मतदारांनी आपला मतदानाचा हक्क अवश्य बजावावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# शस्त्र चालविताना बहरले प्रेम, लग्नही केले, नऊ वर्षानंतर पोलिसांना शरण



**गडचिरोली:** ती भामरागडची अनब तो छत्तीसगडचा. भरतारुण्यात पाऊले भरकटली अनब दोघेही हिंसक नक्षल चळवळीत सहभागी झाले. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले व प्रेमाचा प्रवास लग्नबंधनापर्यंत पोहोचला.मात्र, नक्षल चळवळीत वैवाहिक आयुष्य जगता येत नसल्याने नऊ वर्षांनंतर १४ ऑक्टोबरला त्यांनी शस्त्रे म्यान करुन आत्मसमर्पणाची वाट निवडली. दोघांवर शासनाचे दहा लाखांचे बक्षीस होते, पण आता आत्म समर्पण केल्याबद्दल त्यांनाच शासन साडेअकरा लाख रुपये देणार आहे. अनेक हिंसक कारवायांत सक्रिय सहभाग असलेल्या या दाम्पत्याच्या शरणागतीने नक्षल्यांना मोठा हादरा बसला आहे.

वरुण राजा मुचाकी ऊर्फ उंगा ऊर्फ मनीराम ऊर्फ रेंगु (२७, रा. पिडमिली ता. चिंतागुफा, जि. सुकमा (छत्तीसगड) व त्याची पत्नी रोशनी विज्या वाचामी(२४ , रा. मल्लमपोड्डूर, ता. भामरागड) असे या जहाल माओव-ादी दाम्पत्याचे नाव आहे. वरुण हा भामरागड दलममध्ये कमांडर पदावर तर रोशनी ही याच दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. सन २०१५ मध्ये कोंटा एरीया मध्ये भरती होऊन सदस्य पदावर भरती झाला. २०२० पर्यंत तो दंडकारण्यमधील स्पेशल झोनल कमिटी सदस्य गिरीधर तुमरेटी याचा अंगरक्षक म्हणून तो कार्यरत होता. २०२० ते २०२२ मध्ये तो भामरागडमध्ये उपकमांडपदी पदोन्नतीवर गेला. २०२२ पासून तो भामरागड दलममध्ये उपकमांडर म्हणून कार्यरत होता. त्याने कार्यकाळात १५ गुन्हे केले असून १० चकमकीसह इतर ५ गुन्ह्यांचा समावेश आहे. रोशनी वाचामी ही २०१५ मध्ये राही दलममध्ये भरती होऊन सदस्य पदावर कार्यरत झाली.

२०१६ मध्ये तिची भामरागड दलममध्ये बदली झाली. २०१७ मध्ये ती अहेरी दलममध्ये बदली होऊन गेली. २०१९ मध्ये ती पुन्हा भामरागड दलममध्ये सक्रिय झाली. पुढे एक वर्षे ती गट्टा दलममध्ये होती. २०२२ मध्ये ती पुन्हा भामरागड दलममध्ये बदली होऊन पार्टी सदस्य पदावर कार्यरत होती. तिने २३ गुन्हे केले. त्यात १३ चकमकी व इतर १० गुन्हे केल्याची नोंद आहे.

## आतापर्यंत २७ जणांचे आत्मसमर्पण

**पोलिसांनी माओवादविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच शासनाने माओवाद्यांना आत्मसमर्पणाची संधी दिल्याने २०२२ ते २०२४ या दरम्यान २७ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, राज्य राखीव दलाचे उपमहानिरीक्षक अजय कुमार शर्मा , पोलिस अधीक्षक नीलोत्पल, कमांडट दाओ इंजिरकान किंडो, यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पाडली**

# गोंदिया-भंडारासह इतर जि.प.च्या पदाधिकारी निवडणूकीस मुदतवाढ



**गोंदिया:-** राज्यातील विधानसभा निवडणुकांची बिगुल पुढील आठवड्यात वाजण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी आज महायुती सरकारच्या व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मंत्रिमंडळाची शेवटची बैठक संपन्न झाली.

याबैठकीत जवळपास ८० निर्णय घेण्यात आले असून यामध्ये राज्यातील ज्या जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समिती सभापती, उपसभापतींच्या निवडणूकी येत्या महिन्यात होऊ घातलेल्या होत्या. त्या सर्व पदाधिकारी निवडणूकीस मुद-तवाढ देण्याचा निर्णय ग्राम विकास विभागाच्या वतीने घेण्यात आलेला आहे.या निर्णयामुळे गोंदिया,भंडारा जिल्हा परिषदांसह पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतींच्या निवडणूका आता विधानसभा आचारसंहिता संपल्यानंतर डिसेंबर किंवा जानेवारीत होण्याची शक्यता आहे.

# पोलिसांकडून विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पोलिस दलाच्यावतीने उपद्रवीवर प्रतिबंधात्मक कारवाईच्या दृष्टीने कामकाज सुरु झाले आहे. निवडणुक काळात मतदारांना प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न होत असल्यास त्यावरही पोलिस दलाचे लक्ष राहणार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक गौरख भामरे यांनी दिली आहे.

विधानसभा निवडणूक शांततेत पार पडावी, यासाठी पोलिस दलाच्यावतीने नियोजन सुरु आहे. निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पोलिस प्रशासनाच्या बैठका पार पडल्या आहेत. त्यात आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या काळात प्रलोभनावर बारीक लक्ष ठेवण्याच्या सुचना आहेत.

त्यादृष्टीनेही पोलिस दलाचे नियोजन राहणार आहे. कोणताही उमेदवार, त्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याकडून मतदार, त्याचे कुटुंबिय यांना पैसा अथवा कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखविल्यास ते त्यांच्या अंगलट येऊ शकते.



एकंदर आगामी निवडणुकीची पोलिसांनी आतापासूनच तयारी सुरु केली असून त्यादृष्टीने नियोजन केले जात आहे.

## अनेकांच्या कुंडल्या तयार

**❐आगामी निवडणुकीच्या काळात वाद-विवाद टाळण्यासाठी जिल्ह्यातील १६ पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या उपद्र-वीवीची माहिती मागविली जात आहे.**

**❐गुन्हेगारांवर दाखल गुन्हे त्यांच्यावरील कारवाया याची सर्व माहिती घेऊन त्या-त्या दृष्टीने त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात येणार आहेत.**

**❐यामध्ये आवश्यक त्याला स्थानबद्ध हद्दपारही केले जााऊ शकते, पोलिस प्रशासनाने अनेकांच्या कुंडल्या तयार करुन ठेवल्या आहेत.**

## संवेदनशील ठिकाणांवर लक्ष

**❐मतदारसंघातील संवेदनशील ठिकाणांवरही पोलिसांचे बारीक लक्ष राहणार आहे. त्यासाठी आतापासूनच काम करण्यास सुरुवात केली आहे. स्थनिक पातळीवर तेथील समस्या आणि समस्या निर्माण करणारे घटक याकडे लक्ष ठेवत आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत.**

## बंदोबस्ताची दुहेरी तयारी

**विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभरात एकाच टप्प्यात मतदान झाले तर अन्य जिल्ह्यांतून मिळणार पोलिस बंदोबस्त मिळू शकणार नाही. तसेच दोन अथवा त्यापेक्षा जास्त टप्प्यात मतदान झाले तर शेजारील जिल्ह्यांतून बंदोबस्त मिळणे शक्य होते. त्यामुळे आता ही निवडणूक किती टप्प्यात होते, याकडे लक्ष राहणार आहे.**

**एकाच टप्प्यात मतदान झाल्यास जिल्हा पोलिस दलातील उपलब्ध ती ते साडेतीन हजार मनुष्यबळाचा बंदोबस्त राहू शकतो किंवा दोन किंवा त्यापेक्षा जास्त टप्प्यात मतदान झाल्यास अन्य जिल्ह्यातून वाढीव बंदोबस्त मिळणे शक्य होईल. त्यामुळे पोलिस दलाची दुहेरी तयारी राहू शकते.**

## पाठिंब्यासाठी निर्भय बनोच्या मविआला अटी

**नागपूर :** लोकसभा निवडणूकीपूर्वी निर्भय बनो चळवळीतून केंद्रातील भाजप सरकारविरोधात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात ७५ सभा घेत महाविकास आघाडीला (मविआ) बिनशर्त पाठिंबा दिला गेला होता. आता विधानसभा निवडणूकीपूर्वी नागपुरात सामाजिक कार्यकर्ते एड. आसीम सरोदे आणि विश्वंभर चौधरी यांनी पत्रपरिषदेत घेत मविआपुढे काही अटी ठेवल्या. त्यामुळे मविआचे टेंशन वाढले आहे.

निर्भय बनोच्या माध्यमातून लोकसभानिवडणुकीपूर्वी राज्यभरातील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमुळे देशातील संविधान कसे धोक्यात आहे? हे नागरिकांना पटवून देण्याचा प्रयत्न झाला होता. लोकसभा निवडणुकीच्या निकालात मविआला जास्त जागा मिळाला. त्यात निर्भय बनोचे योगदान होते.

दरम्यान राज्यात येत्या विधानसभा निवडणुकीतही मविआला निर्भय बनोकडून बिनशर्थ पाठिंब्याची आशा आहे. परंतु नागपुरातील प्रेस क्लबमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत एड. आसीम सरोदे व विश्वंभर चौधरी यांनी मविआकडे पाठिंब्यासाठी काही अटी ठेवल्या आहेत.

**काय आहेत अटी**

सध्या मविआचे सरकार सत्तेवर येण्याचे संकेत आहे. त्यासाठी राज्यातील विद्यमान संविधान विरोधी व सर्व नियम धाब्यावर बसवणाऱ्या सरकारबाबत सर्वसामान्यांपर्यंत माहिती जायला हवी. त्यामुळे आम्ही प्रयत्न करू. परंतु सत्तेवर आल्यावर मविआने सर्वसामान्यांना न्याय देण्यापासून दूर जाऊ नये म्हणून काही अटी ठेवत आहोत. त्यानुसार मविआची सत्ता आल्यास त्यांनी नागरिकांना केवळ सत्य सांगावे, येथे धर्मांध वातावरण नसावे, पर्यावरण, आरोग्य, शेती, यासह विविध विषयाला धरून गरीब व मध्यमवर्गीयांना न्याय द्यावा.

**राज्यपालांच्या भूमिकेवर आक्षेप**

राज्यपाल नियुक्त सात आमदारांच्या विषयावरही त्यांनी राज्यपालांच्या भूमिकेवर आक्षेप नोंदवत टीका केली. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांनी त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी आमदार नियुक्तीसाठी यादी दिल्यावरही काही केले नाही. परंतु आता विद्यमान सरकारने यादी दिल्यावर त्याची शहानिषा न करताच तातडीने शपथविधी पूर्ण केला आहे.हे चुकीचे असल्याचेही सरोदे म्हणाले.

विश्वंभर चौधरी म्हणाले, राज्यात केवळ पदवी घेण्यासाठीच नव्हे तर आनंददायी शिक्षण असावे. त्यासाठी मविआने राज्याच्या अर्थसंकल्पातून शिक्षणासाठी १२ टक्के तर आरोग्यासाठी १२ टक्के निधी देण्याची हमी द्यावी.

# पुलामुळे शहराचे दोन्ही भाग जोडण्यास होणार मदत

## अमूत भारत स्टेशन योजनेंतर्गत काम सुरु, बाजार परिसर ते हनुमान मंदिर पालच चौकादरम्यान पुलाचे बांधकाम



**गोंदिया:-** केंद्र सरकारच्या अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत गोंदिया रेल्वेस्थानकांचे आधुनिकीकरण केले जात आहे. या योजनेतून रेल्वे स्थानकावर विविध कामे केली जात आ-हेत. या योजनेतून बाजार परिसर ते हनुमान मंदिर पाल चौकदरम्यान ४० फुट रुंद पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यामुळे शहराच्या दोन्ही भागांना जोडण्यास मदत होणार आहे.

गोंदिया रेल्वेस्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम सुरु झाले आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात ७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. गोंदिया रेल्वे स्थानकावर सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी ३० फुट रुंद पूल बांधण्यात येणार आहे.

उत्तर भागातील रेलटोली परिसरातील हनुमान मंदिराजवळून दक्षिणेकडील बाजार परिसरात तो उतरेल. या पुलावर बाजारपेठाही बांधण्यात ेत असून हा पुल सर्वसामान्यांना रेल्वेगाडीतून बाजारपेठेत ये-जा करण्यासाठी खुला करण्यात येणार आहे. रेल्वेचा मालधक्का राजलक्ष्मी चौकातून हिरडामाली रेल्वेस्थानकाजवळ हलविण्यात येणार आहे.

रेलटोली बाजूकडील फलाट क्र.१ सुरु होईल, जो सध्या मालधक्का आहे. त्या ठिकाणी राहणार आहे. तो प्रामुख्याने बल्लारशाह ते जबलपूर मार्गावरील गाड्यांसाठी वापरला जाणार आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत गोंदिया रेल्वेच्या विकासासाठी सुमारे ७ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

योजनेच्या या पहिल्या टप्प्यात, रेल्वेस्थानक परिसरात प्रवेश करण्यासाठी तीनही रस्ते बाजारापासून कन्हैयालाल धर्मशाळा रोड आणि रेल्वे हॉस्पिटल रोडला जोडले जा-तील. त्याच मुख्य प्रवेशद्वारांवर समाप्त होतील.

याच परिसरात मोठे वाह-तनळ उभारण्याची काम सुरु झाले आहे. त्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांचे क्वार्टर्स पाडण्यात आले आहेत. प्लॅट फार्म क्र.३ आणि ४ वर एस्केलेटर तत्काळ बांधले जातील आणि ज्या प्लॅट फॉर्मवर ते अस्तित्वात नाहीत, अशा ठिकाणी लिफ्ट बसविण्यात येत आहेत.

## सौंदर्यीकरणाचाही असणार समावेश

**रेल्वेस्थानकाच्या उत्तर आणि दक्षिणेला भव्य पार्किंग, सुंदर उद्यान आणि वर्तूळाकार रस्ते तयार केले जात आहेत. त्यामुळे येथील सौंदर्यीकरणात अधिकच भर पडणार असून प्रवाशांना दिल-ासा मिळणार आहे. दुसऱ्या टप्प्यात मालधक्का रेल्वेस्थानकाच्या ठिकाणी रेल्वेचे भव्य प्रवेशद्वार, मुख्य वेटिंग आरक्षण, बाजार आदी सुविधाही केल्या जाणार आहेत. विविध सुविधांमुळे प्रवाशांचा प्रव-ासही सुखकर होणार आहे.**

# मुलांपेक्षा मुलींचा जन्मदर कमीच; स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यास प्रशासन अपयशी

**गोंदिया :** जिल्ह्यात गेल्या ५ वर्षांपासून मुलांपेक्षा मुलींचा जन्म दर कमी होत आहे. एक हजार मुलांमागे ९५६ मुली हे प्रमाण आहे. यामुळे सामाजिक असंतुलन होण्याची चिन्हे दिसत आहेत.

नागरिकांमध्ये बेटी बचाव मोहिमेचा फारसा प्रभाव होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मुलींचा जन्मदर वाढण्याऐवजी कमी होत चालल्याने हा चिंतेचा विषय होत चालला आहे.

वाढत्या स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी प्रसूतीपूर्व निदान तंत्र कायदा १९९४ लागू करण्यात आला आहे. त्यानुसार प्रसूतीपूर्व लिंगनिदान करणे गुन्हा आहे. दर हजारी मुलांमागे मुलींचे प्रमाण वाढावे, हा यामागील उद्देश होता. त्यामुळे या कायद्याची कठोर अंमलबजावणी केली जात असल्याचा कांगावा आरोग्य विभागाकडून केला जात आहे.

सर्वच यंत्रणांकडून 'बेटी बचाओ व बेटी पढाओ' असा नारा दिला जात असला तरी गोंदियात मुलींच्या जन्मदरात घट झाली आहे. त्यामुळे भविष्यात हजार मुलांमध्ये ४४ मुलांना जोडीदार मिळण्याची शक्यता कमीच आहे.

जिल्ह्यात गर्भलिंग निदान चाचणीला कायद्यानुसार बंदी आहे. असे असताना मुलींच्या जन्मदरात जर घट होत असेल तर गर्भलिंग निदान चाचणी न करण्याच्या कायद्याची कठोर अंमलबजावणी जिल्ह्यात होते की नाही? असा सवाल उपस्थित होत आहे. मुलींचा जन्मदर घटल्यामुळे 'बेटी बचाओ' चा नारा केवळ नाममात्र ठरत असल्याचे चित्र आहे.



## याकडे होतेय दुर्लक्ष

**मुलींच्या जन्माचे स्वागत करा, असे सांगणाऱ्या प्रशासनाच्या नाकावर लिंबू टिचून स्त्रीभ्रूणहत्या होत असताना आरोग्य विभागाची गेल्या तीन-चार वर्षांत एकही कारवाई नाही. गोंदियात गर्भनिदान आणि मध्य प्रदेशात गर्भपात केले जात असल्याची चर्चा आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असतानाही शासकीय यंत्रणांचे याकडे दुर्लक्ष झाले आहे.**

**"मुलींच्या घटत्या जन्मदरावरून अजूनही मुलीसंदर्भात मानसिकता बदलेली नाही. अजूनही मुलगा-मुलगी असा भेद केला जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे समाजाने अधिक जागृत होऊन मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याची व व्यापक जनजागृती करण्याची खरी गरज आहे."**

**- सविता बेदरकर, सामाजिक कार्यकर्त्या.**

# महाज्योती स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी मागील वर्षीच्या तुलनेत जागा घटल्या

**नागपूर:** इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील होतकरु विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक व प्रशिक्षण केंद्राद्वारे (महाज्योती) प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. महाज्योतीच्या स्थापनेनंतर हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना फलदायी ठरल्याचे समोर आल्याने राज्यभरातील विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. मात्र जागांची संख्या अपुरी असल्याने अनेक विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची संधी मिळत नव्हती ही बाब लक्षात घेऊन महाज्योतीच्या संचालक मंडळाने तब्बल ३ हजार जागा वाढविण्यास मान्यता गेल्यावर्षी देण्यात आली होती.मात्र यावर्षी पुन्हा जागा कमी केल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय सरकारने केली आहे.

राज्य शासनाच्या इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभागाअंतर्गत महाज्योती ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेमार्फत भटक्या जाती-विमुक्त जाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना विविध स्पर्धा परीक्षा, भरती परीक्षांकरिता मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये युपीएससी, एमपीएससी तसेच मिलीटरी भरतीचे प्रशिक्षण देण्यात येते. केंद्रीय तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेत विद्यार्थ्यांनी जागा वाढवून देण्याची मागणी केलेली होती.

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

त्यानुसार जागा वाढविण्याचा प्रस्ताव महाज्योती संचालक मंडळासमोर आला होता. त्यानुसार दिल्ली येथील युपीएससी प्रशिक्षणासाठी ५०० जागा, पुणे येथील युपीएससी राज्यसेवा प्रशिक्षणासाठी ५०० जागा, एमपीएससी संयुक्त गट प्रशिक्षणासाठी ५०० जागा, तर मिलीटरी भरती प्रशिक्षणासाठी ७५० इतक्या जागा वाढ करण्यास महाज्योतीच्या संचालक मंडळाने वाढविल्या होत्या. सदरचा प्रस्ताव मान्यतेकरितामात्र २४-२५ मध्ये या जागा पुन्हा कमी करण्यात आल्याने मागील वर्षी एवढ्याच जागा पुन्हा मंजूर करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

### अशी आहे जागांची स्थिती

| प्रशिक्षण | मंजूर जागा(२३-२४) | २४-२५ |
|---|---|---|
| युपीएससी (इंग्रजी माध्यम) दिल्ली | १५०० | १००० |
| युपीएससी (मराठी माध्यम) पुणे | १५०० | ७०० |
| एमपीएससी प्रशिक्षण | १५०० | ७५० |
| एमपीएससी प्रशिक्षण संयुक्त गट | १५०० | ८०० |

**अधिकाधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यावर आमचा भर आहे. आतापर्यंतच्या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना चांगला फायदा झाल्याचे समोर आले. अनेक सामान्य कुटूंबातील मुले या प्रशिक्षणामुळे प्रशासकीय सेवेत दाखल होऊ शकेल याचे समाधान आहे.कमी झालेल्या जागा वाढविण्याकरीता सुध्दा प्रयत्न सुरु आहेत.**
**राजेश खवले, व्यवस्थापकी संचालक महाज्योती**

# धान भरडाईच्या दरात राईस मिलर्सवर अन्याय,राज्यपालाकंडे राईस मिलर्सचे साकडे



**गोंदिया:-** शासकीय धान भरडाईच्या दरात शासनाने ४० रुपये दर देण्याचा निर्णय २३ सप्टेंबरच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतला.मात्र या निर्णयामुळे गोंदियातील राईस मिल संचालकामध्ये नाराजीचा सूर असून महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन हे गोंदिया भेटीवर आले असता त्यांची भेट घेत आमच्यावर सरकारने अन्याय केला असून यात मध्यप्रदेश व छत्तीसगड प्रमाणे दरवाढ करण्यात यावी अशी विनंती केली आहे.सोबतच १४० रुपये प्रतिक्विंटल भरडाईचे दर देण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे पुर्व विदर्भात ६ लाख धान उत्पादक शेतकरी असून ६०० च्या जवळपास राईसमिल आहेत. यापासून ट्रांसपोर्ट,ट्रेडर्स व १ लाख कामगारांचा रोजीरोटीचा अवलंबून असते.मात्र गेल्या ३ वर्षापासून सरकारने दुर्लक्ष केल्याने उद्योग संकटात सापडल्याचे म्हटले आहे.सोबतच २०२१(रब्बी),२०२१-२२,२०२२-२३ या वर्षाकरीता व सध्याच्या हंगामाकरीता योग्य दर देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

राज्यात पुर्व विदर्भात धानाचे सर्वाधिक उत्पादन घेतले जाते.त्या धानाची शासकीय हमीभावाने खरेदी केली जाते.त्या धानाची भरडाई करण्याकरीता राईस मिलर्ससोबत करार केला जातो.

धानाची भरडाई करुन सीएमआर तांदूळ शासनाकडे जमा केला जातो. राईस मिलर्सला प्रति १ क्विंटल धानामागे भरडाई करुन ६७ क्विंटल तांदूळ शासनाकडे जमा करावा लागतो.१ क्विंटल धानाच्या भरडाईकरीता ५० रुपये खर्च येतो.पण भरडाईदरम्यान तांदळाचा तुकडा कमी येतो.त्यामुळे तांदळाची उतारी ही ५० ते ५५ किलोच्यावर जात नाही. परिणामी राईस मिलर्सला नुकसान सहन करावे लागते.त्यामुळेच शासनाकडे १४० रुपये भरडाईचे दर देण्याची मागणी गेल्या ११ वर्षापासून सातत्याने करण्यात येत आहे

महाराष्ट्र शेजारी असलेल्या मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यात मात्र महाराष्ट्रपेक्षा अधिक दर दिला जातो.मध्यप्रदेशात २१० रुपये तर छत्तीसगड मध्ये १३० रुपेय प्रतिक्विंटल भरडाईचा दर दिला जातो.महाराष्ट्रात मात्र ५० रुपये किलो भरडाई दर दिला जायचा त्यात आता ४० रुपयाची वाढ करण्यात आली असून ९० रुपये एवढा दर निश्चित करण्यात आला आहे.

# गोंदिया पोलिसांची धडक कारवाई; सात अट्टल गुन्हेगारांना केले तडीपार

**गोंदिया:-** उपविभागीय अधिकारी गोंदिया आणि देवरी यांच्या आदेशान्वये गोंदिया जिल्ह्यातील आणखी सात अट्टल गुन्हेगारांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले आहे. यात गोंदिया शहर हद्दीतील तीन, गंगाझरी दोन, रामनगर व सालेकसा प्रत्येकी एक अश्या सात अट्टल गुन्हेगारांना गोंदिया जिल्हा हद्दीतून तीन महिन्याकरिता हद्दपार केले आहे.गोंदिया शहर ठाण्याच्या हद्दितील कोमल रमेश बनकर (३०) रा. चावडी चौक छोटा गोंदिया याचेवर विविध पोलीस ठाण्यात २० गुन्हयाची नोंद आहे. जय सुनील करीयार (४६) रा. हनुमान मंदीर समोर, दसखोली गोंदिया याच्या विविध पोलीस ठाण्यात ३१ गुन्हयाची नोंद आहे. प्रमोद हिरामण गजभिये (५०) रा. लक्ष्मीनगर, गोंदिया याच्यावर विविध पोलीस ठाण्यात १७ गुन्हयाची नोंद आहे.

गंगाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगार राकेश रामदास मडावी (३५) रा. गंगाझरी, गोंदिया याच्यावर विविध पोलीस ठाण्यात ८ गुन्हयाची नोंद, योगराज भाऊलाल माहूरे (४७) रा. कोहका ता. जि. गोंदिया याच्यावर विविध ८ गुन्हयाची नोंद आहे. रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगार राहुल दिनेशसिंह बरेले (२०) रा. कॉलेजटोली कुडवा गोंदिया याच्यावर विविध ठाण्यात ९ गुन्हयाची नोंद आहे. सालेकसा ठाण्याच्या हद्दीतील अजयकुमार रघुवीरप्रसाद अग्रवाल (५३) रा. साखरीटोला सालेकसा याच्यावर ६ गुन्ह्यांची नोंद आहे. कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या निर्देशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी साहिल झरकर, रोहिणी बानकर, प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पर्वते, पोलीस निरीक्षक प्रविण बोरकुटे, भुषण बुराडे, सुधीर वर्मा यांनी केली आहे. पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या मार्गदर्शनात प्रतिबंधक सेलद्वारे कार्यवाही करण्यात आली आहे.

### सहा आरोपींना तीन जिल्ह्यातून केले तडीपार

**या सात पैकी सहा आरोपींना गोंदिया, भंडारा, बालाघाट जिल्ह्याच्या हद्दीबाहेर तीन महिण्याकरीता हद्दपार करण्यात आले. तर अजयकुमार अग्रवाल याला देवरी उपविभाग अंतर्गत तालुका देवरी, आमगाव, सालेकसा हद्दीतून ती महिण्याकरीता हद्दपार करण्यात आले आहे.**

### गुन्हेगारांवर वचक बसण्यासाठी तडीपारची कारवाई

**नवरात्रोत्सव व होणारी विधानसभा सार्वत्रीक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील अट्टल सराईत गुन्हेगार यांच्याविरूध्द विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यातील नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता, सुव्यवस्था अबाधीत राहावी, वाढत्या गुन्हेगारीला आळा बसावा गुन्हेगारांवर वचक बसावा, गुन्हेगारी प्रवृत्तीना कोणताही थारा दिला जात नाही हा संदेश जनमानसात जावा म्हणुन ठाणेदार गोंदिया शहर, रामनगर, गंगाझरी, सालेकसा यांनी नमूद अट्टल गुन्हेगारांना हद्दपार करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५६ (१) (अ)(ब) अन्वये प्रस्ताव दाखल केला होता. उपविभागीय दंडाधिकारी चंद्रभान खंडाईत, देवरीच्या उपविभागीय दंडाधिकारी कविता गायकवाड यांनी नमूद सराईत गुन्हेगारांचे हद्दपारीचे आदेश काढून- तीन महिन्यांच्या कालावधी करिता गोंदिया जिल्हा बाहेर हद्दपार केले आहे.**

### सन्मानाच्या रोजगाराकडे वळा

**जिल्ह्यातील अट्टल सराईत गुन्हेगारांना ते करीत असलेल्या अवैध कृत्यापासून व अवैध धंद्यांपासून परावृत्त होऊन आपल्या चारित्र्य सुधारून इतर चांगले, वैध रोजगाराकडे वळावे. अन्यथा हद्दपारीच्या कारवाया सुरूच राहतील.**
**- गोरख भामरे, पोलीस अधिक्षक गोंदिया**

# ई-मेल हॅक करून क्रेडिट कार्ड बनविले, ३५ लाखांचे कर्ज उचलले

**गोंदिया:** तरुणाचे आधार कार्ड, पैन कार्डच्या माध्यमातून ई-मेल आयडी हॅक करून क्रेडिट कार्डच्या आधारावर तरुणाच्या नावावर ३५ लाख रुपयांचे कर्ज घेतले. त्या कर्जाच्या रकमेतून सोने व इतर साहित्य आरोपींनी घेतले. या प्रकरणातील मुख्य आरोपीसह या कामात सहभागी असणाऱ्या १३ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. १५ नोव्हेंबर २०२३ ते २० नोव्हेंबर २०२३ या दरम्यान हा प्रकार करण्यात आला.

आमगाव तालुक्यातील शिवजीनगर बनगाव येथील विजय कुशन कोरे (३३) या तरुणाचे उत्पन्न ४ लाख ८० हजार असताना आरोपींनी ९४ लाख रुपये त्याचे उत्पन्न दाखवून त्याच्या नावावर ३७ लाखांच्या कर्जाची उचल विविध बँकेतून केली. त्यांचा मोबाइल व ई-मेल आयडी हॅक करून आयसीआयसीआय बँकेचे क्रेडिट कार्ड चुकीच्या पद्धतीने तयार करून आरोपींनी ३५ लाखांचे कर्ज घेतले.

# व्यक्तिगत योजनांसाठी स्व उत्पन्नावर भिस्त

## मिनी मंत्रालयात योजनांची वाट बिकट, शासन अनुदानाबाबत अनिश्चितता



**गोंदिया:** जिल्ह्याचे मिनी मंत्रालय अर्थात जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या व्यक्तीगत लाभ योजनांना येत्या कार्यकाळात मोठा फटका बसणार आहे. या योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेला स्व उत्पन्नावर मदार ठेवावी लागणार असून राज्य शासनाकडून मोठा निधी मिळण्याची शक्यता कमीच आहे. शिवाय गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी उपक्रम कमी मिळणार असल्याने, सामुहिक योजनांवरह मोठा परिणाम होणार आहे.

जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून विविध करांच्या मोबदल्यात तसेच विकास शिर्षकाखाली कोट्यावधीचा निधी मिळतो. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती १९६१ अनुसार राज्य शासनाकडून जमीन महसुलावरील उपकर, वाढीव उपकर, मुद्रांक शुल्क जि.प.ला मिळतो. कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जमीन महसूल, अनुदान उपकर, वाढीव उपक्रम व प्रोत्साहन अनुदान उपकर अत्यंत महत्वपूर्ण आहे. जिल्हा परिषद व्यक्तिगत व सामूहिक लाभाच्या योजना राबविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करते.

मात्र त्या तुलनेत उत्पन्नाचे स्त्रोत वाढत नसल्याने योजनांना कात्री लावण्याची वेळ येत आहे. मागील अडीच वर्षाच्या कालखंडात राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेला बऱ्यापैकी निधी मिळाला. यातून काही विकासकामे पूर्ण झाली. तर शेकडो कामे निर्माणाधीन आहेत. व्यक्तिगत व सामूहिक लाभ योजनांसाठी जिल्हा परिषदेला स्वतंत्र तरतूद करावी लागते. मात्र, उत्पन्नाचे स्त्रोत न वाढल्याने येणाऱ्या अडीच वर्षाच्या काळात सर्वाधिक अनिष्ठ परिणाम व्यक्तिगत लाभ योजनांवर होण्याचे संकेत आहेत. नवीन वर्षात जिल्हा परिषदेला किती निधी मिळेल? याबाबत संभ्रम आहे.

### जि.प.पुढे मोठे आव्हान

**जिल्हा वार्षिक अनुदानातून अपेक्षाभंगाचे संकेल जिल्हा परिषदेच्या मर्यादित उत्पन्न स्त्रोतांमध्ये व्यक्तिगत लाभाच्या योजना राबविताना मोठी कसरत करावी लागते. याशिवाय नागरी सुविधा, जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती, नवीन खोल्यांचे बांधकाम, आरोग्य उपकेंद्राचे विस्तारीकरण, पशु संवर्धन, पाणी पुरवठा व देखभाल यासाठीही मोठा निधी खर्च होतो. हा निधी कसा मिळवावा हे जिल्हा परिषदेपुढे मोठे आव्हाण ठरणार आहे.**

### बीएलओ, पर्यवेक्षक, ग्रामसेवक, तलाठी यांची सभा

**भंडारा:** पोलीस बहुउद्देशीय सभागृह भंडारा येथे तालुकास्तरीय बीएलओ, पर्यवेक्षक, ग्रामसेवक व तलाठी यांची मतदान जागृती समन्वय सभा पार पडली. या सभेला एसव्हीईईपी जिल्हा नोडल अधिकारी रविंद्र सलामे, उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे, मुख्याधिकारी नगरपरिषद भंडारा करण चव्हाण, बीडीओ पंचायत समिती भंडारा डॉ. संघमित्रा कोल्हे, नायब तहसीलदार आनंद हट्टेवार, घनश्याम सोनकुसरे, एसव्हीईईपी सहायक नोडल अरुण मरगडे, विनोद किंदले, सुनील सावरकर, श्रीकांत वैरागडे, अमित वैद्य, जिल्हा आयकॉन रोहित उईके, प्रामुख्याने उपस्थित होते. सदर सभेमध्ये बीएजी, चुनाव पाठशाळा, यांचे महत्त्व समजून सांगण्यात आले. गाव पातळीवर मतदान जागृती उत्कृष्टरित्या होण्यासाठी सर्व स्तरातील अधिकारी कर्मचारी यांनी समन्वय साधून मतदान जागृती करावी.

# देवी विसर्जनादरम्यान तलावातील खड्ड्यात पडून तिघांचा मृत्यू



**गोदिया :** देवी विसर्जनादरम्यान तलावात खोदलेल्या खड्ड्यात तोल गेल्याने तीन तरुणांचा त्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना सावरीटोला (रावणवाडी) येथील संकुलात शनिवारी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास घडली. आशीष फागुलाल दमाहे (२२), अंकेश फागुलाल दमाहे (१९), यश गंगाधर हिरापुरे (१९) तिघे रा. सावरी ता.गोंदिया असे या घटनेतील मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गावातील तलावात रस्त्याच्या कामासाठी मे २०२४ मध्ये खोदण्यात आलेल्या खड्ड्यात देवीच्या मूर्तीचे विसर्जन करताना तीन तरुणांचा तोल जाऊन खड्ड्यात पडून मृत्यू झाल्याची घटना सावरी येथे घडली. १२ ऑक्टोबर रोजी रात्री १०:३० वाजता रावणवाडी पोलीस ठाण्यांतर्गत हा प्रकार घडला. या घटनेची माहिती मिळतात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथकाने रात्री ३ तास तलावात मृतदेह शोधून एक मृतदेह बाहेर काढण्यात यश मिळवले आणि दुसरा मृतदेह रविवारी सकाळी सापडला आणि एक उपचारासाठी घेवून जात असताना तिसऱ्या तरुणाचा मृत्यू झाला. शनिवारी सावरी गावातील इतर रहिवासी दुर्गा देवी मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन कार्यक्रमात सहभागी झाले होते. अंतिम टप्प्यात सावरी टोला येथील तलावात मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी गावातील ९ तरुण देवीची मूर्ती घेऊन तलावाकडे गेले असता, यश हिरापुरे, आशिष दमाहे, अंकेश दमाहे आणि मागून मूर्ती धरून बसलेला आणखी एक युवक पुढे आला. तलावात खोदलेल्या खड्ड्यात तीन तरुणांची जलसमाधी झाली आणि दुसऱ्या तरुणाने कशी तरी वरून मूर्ती हलवून त्यांचे प्राण वाचवले. या घटनेत मृत्यू झालेल्या आशिष दमाहे या तरुणांची नुकतीच लष्करात निवड झाली होती आणि काही प्रशासकीय प्रक्रियेनंतर तो सरकारी सेवेत रुजू होणार होता.

सावरीटोला शाळेसमोरील तलावात देवी मूर्तीचे विसर्जन सुरू असताना तलावात पडलेल्या खोल खड्ड्याची माहिती नसलेले तरुण "जय माता दी" चा गजर करत मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी घेऊन जात असताना, यादरम्यान सर्व तीन तरुण खड्ड्यात उतरले आणि त्यांचा तोल बिघडल्याने मूर्ती आणि तीन मुले खड्ड्यात बुडाली. या तलावातील अवैध उत्खनन व रात्री दरम्यान हे खड्डे नीट पणे न बुजवल्याने ही घटना घडल्याचे सावरी टोला येथील या घटनेला प्रत्यक्ष पाहणारे नागरिक सांगत आहेत.

# निवडणूक विषयक सोपविलेली कामे गांभीर्याने पार पाडा-जिल्हाधिकारी

## ●प्रत्येक शासकीय कार्यालयात मतदान जनजागृती फोरम कार्यान्वित होणार



**गोंदिया:-** विधानसभा निवडणूक २०२४ कामकाजासाठी विविध कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षात नोडल अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक कामासाठी नियुक्त्या करण्यात आल्या असून नियुक्त अधिकारी -कर्मचारी यांनी निवडणूक विषयक सोपविलेली कामे गांभीर्याने पार पाडावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ विषयक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी एम.मुरूगनंथम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण अंबेकर, महावितरणचे कार्यकारी अभियंता ध्म्मदीप फुलझेले, आनंद जैन, अतुल मेश्राम, याच्यासह कर्मचारी आदीची उपस्थिती होती.

विधानसभा निवडणूक २०२४ कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्वीपच्या माध्यमातून जास्तीत जास्त मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने उदिष्ट पूर्ण करणे आवश्यक असून यासाठी सर्वानी प्रयत्न करावेत तसेच निवडणुकीच्या अनंषंगाने सोपविलेली कामे अर्लट मोडवर राहु पूर्ण करा कोणतीही चुक होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्या, असे निर्देश जिल्हाधिका ?यांनी यावेळी दिले.

मतदान जनजागृती वाढविण्यासाठी आणि मतदानापासून एकही नागरिक वंचित राहणार नाही यासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये मतदान जनजागृती फोरमची स्थापना करून कार्यालयामध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे नातेवाई व शेजारी यांना मतदान जनजागृतीसाठी प्रोत्साहित करणार आहेत. तसेच सर्व कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यालयात मतदान जनजागृती फ्फ़ोरम स्थापन करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी प्रजित नायर यांनी यावेळी दिल्या.

# जिल्हास्तरीय भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धा थाटात; विजयी चमू करणार विभागात जिल्ह्याचे नेतृत्व

## लोकनृत्य स्पर्धेत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय शाळा डव्वा प्रथम तर भूमिका अभिनय स्पर्धेत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय शाळा सरांडी प्रथम



**गोंदिया:-** राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण उपक्रम अंतर्गत "भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धा २०२४-२५" चे आयोजन "जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गोंदिय" च्या वातानुकूलित सभागृहात दि. ११ ऑक्टोबर २०२४ ला संस्थेचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली व विभाग प्रमुख अधिव्याख्याता पूनम घुले, अधिव्याख्याता डॉ. भाऊराव राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी जीवनात आनंद मिळविण्यासाठी एकतरी कला जपावी असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नरेश वैद्य यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख अधिव्याख्याता पूनम घुले यांनी करून स्पर्धेबाबत सविस्तर असे मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थिती मध्ये असलेले डॉ. भाऊराव राठोड यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील अभिनयाचे दाखले देत विद्यार्थ्यांना यथोचित असे मार्गदर्शन केले. यात जिल्ह्यातील जिल्हा परिषद हायस्कुल गोरेगाव, ककोडी, अर्जुनी मोर, शासकीय समाजकल्याण विभाग संचालित अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शाळा डव्वा ता. सडक अर्जुनी, सरांडी (ता. तिरोडा), मुलांची शाळा नंगपुरा मूर्री, यांनी सहभाग नोंदविला व पर्यावरण संरक्षण, जंगल संरक्षण या विषयावर लोकनृत्य सादर केले. तसेच पौष्टिक आहार व आरोग्य, निरोगी वाढ, वैयक्तिक सुरक्षा , इंटरनेट चा सुरक्षित वापर आणि मीडिया साक्षरता, अमली पदार्थांचा गैरवापर, त्याची कारणे आणि प्रतिबंध या विषयावर भूमिका अभिनय सादर करण्यात आले.

सदर स्पर्धेचे परीक्षण संगीत शिक्षक राधेश्याम चौधरी व डी एड कॉलेज च्या अध्यापकाचार्य मीनाक्षी कटरे यांनी केले.

लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय शाळा डव्वा ( ता. सडक अर्जुनी), द्वितीय क्रमांक शहीद जान्या तिम्या जि.प. हाय. गोरेगाव तर तृतीय क्रमांक अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय शाळा नंगपुरा/मुर्री (ता. गोंदिया) यांनी पटकावला. भूमिका अभिनय स्पर्धेत प्रथम क्रमांक अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय शाळा सरांडी (ता. तिरोडा), द्वितीय क्रमांक अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय शाळा डव्वा ( ता. सडक अर्जुनी) तर तृतीय क्रमांक शहीद जान्या तिम्या जि.प. हाय. गोरेगाव यांनी पटकावला. यातील प्रथम क्रमांकाची चमू दि. १७ ऑक्टोबर ला विभागस्तरावर होणाऱ्या विभागीय स्पर्धेत गोंदिया जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

विजयी चमुंना व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य, विभाग प्रमुख पूनम घुले, अधिव्याख्याता डॉ. भाऊराव राठोड, परीक्षक राधेश्याम चौधरी व मीनाक्षी कटरे यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन शिक्षक सुनील हरिनखेडे तर आभार साधनव्यक्ती वशिष्ठ खोब्रागडे यांनी मानले.

### जिल्ह्यात लष्करी अळीचा प्रादुर्भाव कृषि विभागाने सुचविल्या उपाययोजना

**गोंदिया:** जिल्ह्यात भात मुख्य पीक असून या पिकावर खोडकिडा, गादमाशी व तपकिरी/हिरवे तुडतुडे ह्या सतत प्रादुर्भाव करणा ?्या किडी आहे. परंतु सद्यस्थितीतील पिकाची अवस्था व वातावरण हा लष्करी अळीच्या प्रादुर्भाव पोषक असून केव्हाही उद्रेकीय स्थिती निर्माण होऊ शकते. तरी शेतकरी बांधवांनी आपल्या धान पिकाची पाहणी करुन खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्या, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, गोंदिया यांनी केले.


**कार्यालय कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ गोंदिया**
**कार्या.दुरध्वनी क्रमांक ०७१८२-२५००६४**
office e-mail :-egsgondia.ee@mahapwd.gov.in
website :-www.mahapwd.gov.in

जावक क्र.:-५३३६ /नि.लि./२०२४ दिनांक :- १४/१०/२०२४

**ई-निविदा सुचना क्र.२२ (२०२४-२५)**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ गोंदिया हे महाराष्ट्र शासनाचे सां.बां. विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अ नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यात निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत लक्षात |
|---|---|---|
| १ | गोंदिया जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१, गोंदिया अंतर्गत आमगांव गोरेगांव, तिरोडा व गोंदिया तालुक्यातील सर्व शासकीय इमारत परिसरात व रस्त्याचे बाजूला वृक्षारोपण चे कामे करणे. | रू.२६७.१६ |

१) ई-निविदा उपलब्ध कालावधी: As per e-tender Schedule uploades on e-portal
ई-निविदा उघडणे: ऑनलाईन नमुद केल्यानुसार वेळापत्रक रक्कम स्थळ इ.लागू व अंतिम राहील. खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. २.इतर अटी व शर्ती ई-निविदा नमून्यामध्ये उपलब्ध असून त्यानुसार निविदा सादर करावी. कोणतेही किंवा सर्व निविदा कोणतीही कारण नसांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आलेले आहे. ३) सदर निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईटवरच प्रकाशित केल्या जाईल. तसेच निविदाधारकांनी बिड लॉक झाल्यानंतर ७२ तासाचे आत निविदे संबंधित कागदपत्रांची (Hard Copy) (Technical Envelope) सिलबंद लिफाफ्यामध्ये निम्न स्वाक्षरीकारांचे कार्यालयात सादर करावे. ४) कार्यकारी अभियंता, सां.बा.विभाग क्र.१ गोंदिया कार्यालयातील सुचना फलक.

**(एन.टी.लभाने)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ गोंदिया**

# ओबीसींच्या लढ्याला यश; अखेर वसतिगृह विद्यार्थ्याकरींता सुरू झाले



**गोंदिया** : वर्षानुवर्षांपासून ओबीसी वसतिगृहाची मागणी ओबीसी संघटनांकडून केली जात होती. याकरिता अनेकदा मोर्चे काढण्यात आले. आंदोलने करण्यात आली.भीख मांगो आंदोलनही करण्यात आले. मुख्यमंत्र्यापासून मंत्र्यापर्यंत सर्वांशीच यावर सवांद साधण्यात आले. आणि अखेर ओबीसींच्या लढ्याला यश आले असून, बुधवारी (दि.९) नागपुरात राज्यातील ४४ ओबीसी मुलाम ुलींच्या वसतिगृहांचे लोकार्पण केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दुरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.



नागपूर येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तर प्रमुख अतिथी म्हणून इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, आमदार डॉ. परिणय फुके हे दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाम ार्फत गोंदिया येथे २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून सुरू होणाऱ्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील पदवी शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या व मुलींच्या शासकीय वसतिगृहाचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. गोंदियातील आयोजित कार्यक्रमाला आमदार विनोद अग्रवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम., इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद मोहतुरे, ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे, ओबीसी आघाडी भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र फुंडे, राजेश बिसेन मंचावर उपस्थित होते. सदर कार्यक्रम विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील मुलींचे शासकीय वसतिगृह, संकल्प चौक, गणेशनगर, गोंदिया येथे पार पडला.

जिल्ह्यात इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी दोन शासकीय वसतिगृह कार्यान्वित झाल्यामुळे याचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होणार आहे, असे मत आमदार विनोद अग्रवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी गेल्या अनेक वर्षापासून ओबीसी संघटनानी केलेल्या मागणीला यश आले असून ओबीसी योध्दांच्या कार्याचा गौरव करीत राज्यसरकार पुढेही ओबीसींच्या मुलांच्या हिताकरीता निर्णय घेत राहील असे विचार व्यक्त केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी वसतिगृहाचे आज भाड्याच्या इमारतीत उदघाटन होत असले तरी भविष्यात लवकरच स्वतःच्या मालकीच्या जागेत हे शासकीय वसतिगृह बघावयास मिळेल असे सांगत वसतिगृहाचा वापर विद्यार्थी विद्यार्थींनी योग्यरित्या करुन अभ्यासाच्या माध्यमातून नावलौकीक मिळवावे असे विचार व्यक्त केले.



यावेळी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील अनेक ओबीसी संघटनांनी राज्य सरकारकडे केलेल्या पाठपुरावा व आंदोलनामुळे सरकारला दखल घ्यावी लागली. सरकारला वसतिगृह सुरू करावे लागले. हा ओबीसींच्या एकजुटीचा विजय आहे.१९९९ पासून ओबीसी संघटना वसतिगृहाच्या मुद्यावर आंदोलन करीत होते. आज हे वसतिगृह सुरु होत असल्याने आम्हाला आनंद असून आम्ही सरकारच्या या निर्णयाचे स्व-ागत करतो,असे म्हणत सरकार तालुकास्तरावर पहिल्या टप्प्यात १०० वसतिगृह सुरु करावे, सोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करुन समाजाचा सर्वांगीण विकास साधावा असे विचार व्यक्त केले. भाजप ओबीसी आघाडीचे गजेंद्र फुंडे यांनी सरकारच्या निर्णयाचे स्व-ागत केले.



राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी प्रत्येकी एक वसतिगृह याप्रमाणे गोंदिया जिल्ह्यात आज दोन शासकीय वसतिगृह सुरु करण्यात आले. सदर वसतिगृह हे सध्या भाड्याच्या इमारतीत सुरू करण्यात आले आहे. सध्या मुलींच्या वसतिगृहात ५३ मुली प्रवेशित झाल्या असून मुलांच्या वसतिगृहात २६ मुले प्रवेशित झालेले आहेत, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद मोह-तुरे यांनी प्रास्ताविकातून दिली. संचालन समाज कल्याण निरीक्षक स्वाती कापसे यांनी केले.

कार्यक्रमाला ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.बी.एम. करमकर, डॉ.गुरुदास येडेवार, रमेश ब्राम्हणकर, भुमेश शेंडे, ओबीसी अधिकार मंचचे कैलास भेलावे, नरेश परिहार, उमेश कटरे, हेमराज भेलावे, भुवन रिनाईत, कमल हटवार, अश-ोक पडोळे, सुधीर गायधने, ओबीसी संघर्ष कृती समितीचे एस.यु.वंजारी, प्रा.संजीव रहांगडाले रामेश्वर बागडे, भागचंद रहांगडाले, रवी भांडारकर, भारतीय पिछडा शोषीत संघाचे प्रेम साठवणे, युवा बहुजन विचार मंचचे सुनिल भोंगाडे, डॉ.गराडे, समाजसेविका डॉ.सविताताई बेदरकर, प्रा.दिशा गेडाम, मुनेश्वर कुकडे, रविंद्र तुरकर, गौरव बिसेन, विभागाचे अधिकारी कर्मचारी, इतर मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुले-मुली व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामांचा निधी लोकप्रिय योजनांकडे

## बिले थकल्याने कंत्राटदार हवालदिल

| अशी आहेत प्रलंबित देयके (रुपयांत) |
|---|
| सार्वजनिक बांधकाम विभाग : २४ हजार कोटी |
| ग्रामविकास विभाग : ६५०० कोटी |
| जलजीवन मिशन विभाग : १९०० कोटी |
| जलसंधारण विभाग : ९७८ कोटी |
| मुख्यमंत्री ग्रामसडक योजना : १८७६ कोटी |
| महानगरपालिका व नगरपालिका विभाग : ९५६ कोटी |



### कंत्राटदारांचा आंदोलनाचा पवित्रा

**गेल्या दोन ते तीन महिन्यांत निधी लोकप्रिय योजनेकडे वळविला जात आहे. लाडकी बहीण, लाडका भाऊ यासह अनेक योजनांकडे हा निधी वळविण्यात येत आहे. यामुळे झालेल्या कामांची बिले कंत्राटदारांना मिळत नसल्याचे चित्र आहे. ही देयके काही लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहेत. देयके मिळत नसल्याने सर्व कंत्राटदारांनी आता आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. असे राज्य कंत्राटदार संघटनेचे कार्याध्यक्ष सुनील नागराळे यांनी सांगितले.**

**एकाच्या ताटात असलेले अन्न दुसऱ्याला देण्यासाठी पहिल्याला उपाशी ठेवले जात आहे. तिजोरीत पैसे नसताना निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर निविदा मंजूर करुन कामे सुरु आहेत; पण त्याची देयकेच दिली नसल्याने कंत्राटदार अडचणीत आले आहेत.**

**मिलींद भोसले, अध्यक्ष, राज्य कंत्राटदार संघटना**

**गोंदिया:** रस्ते, पाणीपुरवठा, बांधकाम, सिंचन यासह विविध विकास कामांचा निधी राज्य सरकारने लाडकी बहीण, लाडका भाऊ यासह विविध लोकप्रिय योजनांकडे वळवला आहे. यामुळे विकासकामे सुरु असलेल्या राज्यातील कंत्राटदारांची बिले तर थकली आहेत; शिवाय कामेही प्रलंबित पडली आहेत.

यामुळे महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेचा याविरोधात मोठे आंदोलन उभे करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. २५ सप्टेंबर रोजी ते आंदोलनाचा निर्णय जाहीर करणार आहेत.

राज्यातील सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, जलजीवन मिशन, जलसंधारण, जलसंपदा, महापालिका व नगरपालिका विभाग, मुख्यमंत्री सडक योजना हे सामान्यपणे राज्यातील शहर विभाग व जिल्ह्यातील गाव, तालुका स्तरावरील विकासाची कामे करणारी महत्वाचे विभाग आहेत. या विभागाकडून रस्ते, सरकारी इमारती, जलसिंचन, पाणीपुरवठा यासह विविध विकासकामे सुरु आहेत. निवडणूका डोळ्यासमोर ठेवून गेल्या दीड-दोन वर्षापासून सदर दिभागांकडून मोठ्या प्रमाणात कामे सुरु आ-हेत. छोटे-मोठे कंत्राटदार, विकासक, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, मजूर संस्था यांनी यातील काही कामे पूर्ण केली आहेत. परंतु कामांची देयकेच मिळत नसल्याने कंत्राटदार हवालदिल झाले आहेत.

# डांगोर्ली बॅरेज आणण्याचे श्रेय फक्त आमदार विनोद बाबूंनाच-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**गोंदिया:-** विनोद अग्रवाल यांच्या रूपाने असा चपळ आमदार लाभला हे या भागातील जनतेचे भाग्य आहे. त्यांनी भाजप कधीही सोडला नाही, पण दुप्पट वेगाने परत येण्याचे काम केले. त्यांच्या पाच वर्षांची मागील वर्षांशी तुलना केली, तर विकासकामात विनोद बाबूंचा वरचष्मा राहिला आहे, असे मी ठामपणे म्हणू शकतो. शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी वरदान ठरलेला डांगोर्ली बॅरेज आणण्याचे श्रेय केवळ विनोद अग्रवाल यांनाच आहे. असा मानस राज्याचे उपम ुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



गोंदियातील टीबी टोली मैदानावर भाजपच्या वतीने आयोजित कर्तव्यनिष्ठ जन आशीर्वाद महासंमेलनात उपम ुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री डॉ.परिणय फुके, गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले, माजी मंत्री राजकुमार बडोले, केशवराव मानकर, भेरसिंगभाऊ नागप-ुरे, भाजप जिल्हाध्यक्ष येसूलाल उपराडे, विजय शिवणकर, जिल्हा संघटन मंत्री वीरेंद्र (बाळाभाऊ) अंजनकर, जि.प.चे अध्यक्ष पंकज रहांगडाले, नेतराम कटरे, पंस सभापति मुनेश रहांगडाले, कृउबास सभापति भाऊराव उके, सुनील केळनका, छत्रपाल तुरकर, दिनेश दादरीवाल, संजीव कुलकर्णी, जयंत शुक्ला, मनोज मेंढे, नंदूभाऊ बिसेन, अमित झा, सीताताई, रहांगडाले, भावना कदम, चेतालीसिंग नागप-ुरे यांच्यासह अनेक भाजप नेते उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, विनोद बाबूंनी प्रत्येक निवडणुकीत भाजपसोबत राहण्याचे काम केले, त्यांनी जे म ागितले ते देण्याचे काम सरकारने केले. डांगोर्ली नदीवर उच्चस्तरीय बॅरेज बांधावा, अशी मागणी त्यांनी केली होती. यासोबतच गोंदियात आल्यावर रिकाम्या हाताने येऊ नका, माझ्या शेतकरी बांधवांसाठी सिंचन क्रांतीसाठी डांगोर्ली बॅरेज आणा, असेही ते म्हणाले. मीही माझे वचन पाळले आणि विन-ोद बाबूंच्या सांगण्यावरून ३९५ कोटी रुपये खर्चाचा डांगोर्ली बॅरेज आणला आणि त्याची प्रतही सुपूर्द करत आहे. काही लोक खोटी आश्वासने देतात, लोकांमध्ये जाऊन आम्ही आणले याचा खोटा प्रचार करतात, पण मला सांगायचे आहे की केवळ डांगोर्लीच नाही तर पिंडकेपार, मेडिकल कॉलेज, गोंदियाला २४ तास शुद्ध पाणी मिळेल या साठी २०० कोटींची पाणीपुरवठा योजना आणण्याचे श्रेय फक्त विनोद बाबूयानांच आहे.

विनोद अग्रवाल यांनी धाना-वरील हेक्टरी बोनसची रक्कम २० हजारांवरून २५ हजारांपर्यंत वाढविण्याच्या मागणीवर उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जी मागणी केली ती पूर्ण झाली असी मी शब्द देतो. लाडली योजना संपूर्ण राज्यात लागू करण्याची मागणी केली, आम्ही पूर्ण करून राज्यात सुरु केली, शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्याची मागणी वर, विज बिल शून्य करण्याचा प्रयत्न केला, आता शेतकऱ्यांना २० हजारांऐवजी २५ हजार रुपये धानावर बोनस देणार आहोत. आज मी घोषणा करत आहे, फक्त हे देखील झाले आहे हे समजून घ्या.

फडणवीस पुढे म्हणाले, या महायुती सरकारने लॉडली बहन योजना आणून राज्यातील भगिनींना आर्थिक पाठबळ देण्याचे काम केले आहे. बहिणींना अधिक स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या. पण काही कट रचणाऱ्या सावत्र भावांनी ही योजना बंद करण्याचा दुस्साहस रचला आहे. कांग्रेस चे नेते, शिवसेना चे नेते म्हणतात आमचे सरकार आले तर महायुतीचे सगळे योजना बंद करू, मी माझ्या भगिनींना आवाहन करतो की, आगामी निवडणुकीत अशा लोकांनी धडा शिकवा आणि विनोद अग्रवाल यांचे कमळ पाजून मुंबईला पाठवा. आम्ही वचन देतो की आम्ही ही योजना सतत चालू ठेवू.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विनोद अग्रवाल यांचे दुप्पट वेगाने भाजपमध्ये पुनरागमन करताना त्यांचे जोरदार स्वागत केले. ते म्हणाले, आज इंद्रही दयाळू आहेत आणि देवेंद्रजीही उपस्थित आहेत. अशा स्थितीत गोंदियातून कमळ फुलण्यापासून कोणीही रोखू शकत नाही.

विनोद अग्रवाल यांच्यासह माजी मंत्री डॉ.परिणय फुके, राजकुमार बडोले, संजय पुराम, नेतराम कटरे, बाळाभाऊ अंजनकर, येसूलाल उपराडे, सविता अग्रवाल, चेतलीसिंग नागपुरे, घनश्याम पानतवणे आदींनीही संबोधित केले. संचालन पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले यांनी केले.

# यावर्षी धानाला २५ हजार रुपये बोनस देणार-उपमुख्यमंत्री फडणवीस



**धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा २ हा प्रकल्प गोंदिया जिल्हयातील तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीवर असून गोंदिया जिल्हयातील तिरोडा, गोरेगाव, सडक अर्जुनी, मोरगाव अर्जुनी या तालुक्यातील २१४ गावातील एकूण ८०७२६ हेक्टर व भंडारा जिल्ह्यातील मोहाडी, लाखांदुर व साकोली या ३ तालुक्यातील २० गा-वातील ९४२० हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.या प्रकल्पाचे काम पुर्ण झाल्यानंतर गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील १५ तलावांमध्ये पाणी भरणा करुन अतिरीक्त ६६१७० हेक्टर व एकुण ९०१४६ हेक्टर सिंचन क्षमता निर्मित होणार आहे. त्यामुळे गोंदिया व भंडारा जिल्ह्या-तील एकुण २३४ गावांतील जवळपास १ लक्ष ५८ हजार शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे.**

**धान बोनस-२२- २०२३ मध्ये १५००० रुपये,२३-२०२४ मध्ये २०००० रुपये व २४-२०२५मध्ये २५००० मिळणार**

**गोंदिया**:-येत्या पाच वर्षापर्यंत कुठल्याही शेतकर्याला कृषी पंपाचे विज बिल भरायचे नसून उपसा सिंचन योजनेला सुध्दा त्याकरीता आम्ही आधीच निधी दिला आहे.धानाचा बोनस यावर्षी सुध्दा देणार असून यावर्षी २५ हजार रुपयाचा बोनस देण्याची फाईल मुख्यमंत्र्याकडून मंजूर करवून घेतो अशी घोषणा केली.

धापेवाडा योजनेच्या टप्पा २ व ३ चे भुमिपूजन आणि दुरुस्त झालेल्या वितरिकेचे लोकार्पण आज करण्यात आले असून ७५ हजार हेक्टर जमीन शेतजमिन सिंचनाखाली येणार असून तिरोड्याचे आमदार विजय रहांगडाले हे आमदारच नव्हे तर पाणीदार आमदार असल्याची ग्वाही दिली.आपल्या सरकारने सिंचनाला महत्वा दिले असून शेतकऱ्यांचा विकास हाच आम च्या पक्षाचा मुलमंत्र असल्याचे सांगत भाजपच्या काळातच विदर्भातील सिंचनाचे प्रश्न मार्गी लागले.काँग्रेसकाळात विदर्भातील सिंचनाच्या प्रकल्पाला निधीच मिळत नव्हता, त्यामुळे सिंचनाचे प्रश्न आम्हाला सोडवण्याची संधी मिळाल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ते तिरोडा येथे धापेवाडा टप्पा २ व तिरोडा नगरपरिषदेतील भुयारी गटर योजना आणि इतर कामाच्या भुमिपूजन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार विजय रहांगडाले, आमदार डॉ.परिणय फुके, माजी आमदार राजेंद्र जैन, हेमंत पटले, खोमेश्वर रहांगडाले,भजनदास वैद्य, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, जिल्हा परिषद सभापती संजय टेंभरे,बाजार समितीचे सभापती पिंटू रहांगडाले, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम कटरे, जिल्हा परिषद व पंचायत सदस्य, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना उपमुख्यंत्री फडणवीस म्हणाले की,१ कोटी लखपती दिदी करायचा निर्धार आम्हाला करायचा असून मोदीजींनी दिलेला मंत्र आपल्याला जपायचे असल्याचे म्हणाले.आपल्या लाडक्या बहिण योजनेविरुध्द काँग्रेसचे लोक न्यायालयात गेले की ही योजना फसवी आहे, तर नाना पटोले, उध्दव ठाकरे व पवारसाहेब ही योजना आपली सरकार आल्यावर बंद करु असे म्हणत आहेत. परंतु ज्यांच्यासोबत लाडक्या बहिणी आहेत त्यांचीच सरकार पुन्हा येणार असल्याने त्यांचे स्वप्न हे असेच राहणार असल्याची टिका केली.

यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सर्वाधिक निधी आपल्या मतदारसंघाच्या विकासाकरीता आणणारे आमदार विजय रहांगडाले असून महाराष्ट्रातील पहिल्या २५ आमदारांमध्ये यांचा समावेश असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले.मुलगा अविष्कारची आठवण करीत त्या दुःखा-तही आपल्या सेवेसाठी पक्षाचा व मतदारसंघाचा काम विजयने केला, असा आमदार आपल्याला भेटणे शक्य नसल्याचे विचार व्यक्त करीत शेतकरी, लाडक्या बहिणी, युवकांच्या हितासाठी आमचा पक्ष काम करीत असल्याची ग्वाही दिली. तसेच येत्या विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांची जमानत जप्त करीत भाजपचा कमळ फ ुलवण्याचे आवाहन केले.

प्रास्तविकात आमदार विजय रंहागडाले यांनी धापेवाडा टप्पा २ व ३ चे भुमिपूजनासह जलपूजन करण्यात येत असल्याचे सांगत चोरखमारा व बोदलकसा कालव्याचे लोकार्पण करण्यात येत असल्याचे सांगत ५२१७ कोटी रुपयाच्या निधीचे सर्वात मोठे भूमिपूजन होत आहे. पांगडी, कटंगीजलाशयाच्या कालव्यांची दुरुस्ती होणार आहे. खळबंदा जलाशयाच्या कालव्याची दुरुस्ती न झाल्याने पाणी जात नाही. त्याकरीता १०० कोटीच्या कामाचे प्रस्ताव आहेत,त्यांना मंजुरी देण्याची मागणी केली.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन यांनी धापेवाडा सिंचन योजनेची सुरवात प्रफुलभाई पटेल व अजितदादांच्या नेतृत्वात सुरु झाले, त्या योजनेला आता देवेंद्रभाऊच्या माध्यमातून पुढे नेले जात असल्याचे सांगत ही योजना कधीच बंद होऊ शकत नसल्याचे सांगितले.धान उत्पादक शेतकर्यांना गेल्या वर्षी २० हजाराचे बोनस दिले होते,यावर्षी ५ हजाराची वाढ करुन २५ हजार करण्यात यावे, तसेच दिवाळीपुर्वी धान खरेदी केंद्र सुरु करण्यात यावे अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून मांडली.



आमदार परिणय फुके यांनी तिरोडा मतदारसंघात विजय रहागंडालेनी विकासाची गंगा आणली असून राज्यात देवेंद्र फडणवीसांच्या माध्यमातून विकासाकडे वाटचाल केल्याचेही म्हणाले.२०१४ ते १९ पर्यंत राज्यात एकाही शेतकर्याची वीज कापली गेली नाही असे सांगत आता विज बिल माफ केल्याचे म्हणाले. संचालन माजी जि.प.उपाध्यक्ष मदन पटले यांनी केले

# चरण वाघमारे यांच्या हाती राष्ट्रवादीची तुतारी



**तुमसर:** तुमसर विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार चरण वाघमारे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. मुंबई येथे शरद पवारांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. त्यामुळे आता चरण वाघमारे हे तुमसर विधानसभा मतदारसंघातून तूतारी हातात घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा आहे.

भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार असलेल्या चरण वाघमारे यांनी यापूर्वी बीआरएस पक्षात प्रवेश केला होता. मात्र आंध्र प्रदेशात सत्ता बदल झाल्यानंतर बीआरएसचे भवितव्य धोक्यात आले. त्यानंतर झालेल्या जिल्हा परिषद आणि लोकसभा निवडणूक माजी आमदार चरण वाघमारे यांनी काँग्रेसला पाठिंबा जाहीर केला होता.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी चरण वाघमारे हे काँग्रेसचे उमेद-वार असतील अशी जोरदार चर्चा होती. मात्र काँग्रेसमधील काही लोकांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध दर्शविला होता. दरम्यान येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाघमारे नेमकी काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष होते. ते अपक्ष निवडणूक लढतील असे वाटत असताना दुसरीकडे शरद पवार यांच्या संपर्कातही ते होते.

अखेर मुंबई येथे त्यांनी शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे या राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी वाघमारे यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. वाघमारे यांच्या या प्रवेशामुळे येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे उमेद-वार असतील हे जवळपास निश्चित मानले जात आहे. असे झाल्यास दोन राष्ट्रवादींमध्ये या ठिकाणी लढत होणार हे स्पष्ट आहे.